स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक
०२०२५६२२६८०
०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६२२६९०
०२०२५६२२६९१

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११००७

फॅक्स क्रमांक २५६०११५४

**रासेयो/२०२४-२५/१९५** **दि. २३/०८/२०२४**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**फक्त पुणे व पिंपरी चिंचवड शहर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्याचे एकविसाव्या शतकातील महत्व आणि समयोचितता या राष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी होणेबाबत...**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षातील उपक्रमांतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्याचे एकविसाव्या शतकातील महत्व आणि समयोचितता या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दिनांक ३० व ३१ ऑगस्ट, २०२४ रोजी, शिक्षणशास्त्र संकुल सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ठिकाणी करण्यात आलेले आहे. या राष्ट्रीय परिषदेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्याचा एकवविसाव्या शतकातील महत्त्व व समयोचितता या विषयावर मा. कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, मा.कुलसचिव, विद्यापीठ अधिकार मंडळाचे सदस्य आणि नामांकित विविध तज्ज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा. केंद्रीय राज्यमंत्री, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मा. मंत्री, सांस्कृतिक विभाग, अध्यक्ष आइ.सी.सी.आर. यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

तरी सदर राष्ट्रीय परिषदेकरिता मा. कुलगुरू आणि विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्देशानुसार पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी विकास मंडळाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ (स. १० ते सायं. ६) व ३१ ऑगस्ट, २०२४ (स. ९ ते सायं. ६) या वेळेत शिक्षणशास्त्र संकुल सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ याठिकाणी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. सदर राष्ट्रीय परिषदेच्या सहभागाकरिता https://forms.gle/nK41Lf8PbjU5vDgy9 या लिंकद्वारे दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ पर्यंत नावनोंदणी करणे आवश्यक आहे. सदर परिषदेकरिताचा प्रवास खर्च महाविद्यालयाच्या प्रशासकीय/रासेयो नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा व सदर कालावधीत संबंधित कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांची कर्तव्य रजा मंजूर करावी. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**विद्यार्थी विकास मंडळ**

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**